शहिद जवानांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपयांची मदत देणार

राज्य सरकारचा निर्णय

विशेष प्रतिनिधी



मुंबई, मंगळवार - देशासाठी युद्धात अथवा युद्धजन्य परिस्थितीत धारातीर्थी पडणाऱ्या शहिद जवानांच्या कुटुंबियांना राज्य सरकारकडून एक कोटी रूपयांची मदत करण्यात येणार आहे. जखमी जवानांनाही २० ते ६० लाख रुपयांपर्यंतची मदत करण्यात येणार आहे.

राज्यमंत्रीमंडळाने हा निर्णय घेतला आहे.

युद्ध व युद्धजन्य परिस्थितीत तसेच देशांतर्गत सुरक्षेसंबंधी मोहिमेदरम्यान प्राण गमावलेल्या किंवा अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या तसेच सीमा सुरक्षा बल व इतर निमलष्कर दलातील व्यक्तींच्या कुटुंबीयांना राज्य शासनाकडून एकरकमी अनुदान दिले जाते. देशाबाहेरील मोहिमेत शहीद अथवा अपंगत्व आलेल्या जवानांनाही ही मदत दिली जाते.१९९९ मध्ये दोन लाख अनुदान देण्यात येत हाते.त्यात वेळोवेळी वाढ करण्यात आली होती. सध्या शहिदांच्या कुटुंबीयांना २५ लाख आर्थिक मदत देण्यात येत होती. तसेच अपंगत्व आलेल्या जवानांना अपंगत्वाचे प्रमाण १ टक्का ते २५ टक्के असल्यास ५ लाख, २६ टक्के ते ५० टक्के असल्यास साडेआठ लाख तर ५१ टक्के ते १०० टक्के असल्यास १५ लाख रुपये देण्यात येत होते.

१ जानेवारी २०१९ पासून शहिदांच्या कुटुंबीयांना देण्यात येणाऱ्या या एकरकमी अनुदानाची रक्कम एक कोटी रुपये केली. अपंगत्व प्राप्त झालेल्या राज्यातील जवानांना १ टक्के ते २५ टक्के अपंगत्व आल्यास २० लाख, २६ टक्के ते ५० टक्के अपंगत्व आल्यास ३४ लाख व अपंगत्वाचे प्रमाण ५१ टक्के ते १०० टक्के असल्यास ६० लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला.

बेस्टच्या दर कपातीमुळे शेअर टॅक्सी, रिक्षाचे दर घटले

प्रतीप आचार्य

मुंबई, मंगळवार- बेस्टने आपल्या दरात कपात केल्यानंतर शेअर रिक्षा, टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला. अवघ्या ५ रुपयांत आणि 'एसी'ने अवघ्या सहा रुपयात जायला मिळत असल्याने नागरिकांनी रिक्षा व टॅक्सीकडे पाठ फिरवली. अखेर शेअर रिक्षा व टॅक्सी चालकांनी आपले दर स्वत: हून कमी करण्याचे पाऊल उचलले आहेत.

चारकोप-कांदिवली रेल्वे स्थानक मार्गावर शेअर रिक्षा व टॅक्सी धावतात. त्यांनी आपले दर ३ रुपयांनी कमी केले. बसनी आपले दर कमी केल्याने आम्हालाही आमचे दर कमी करावे लागले, असे रिक्षा चालक अरिफ अली याने सांगितले. पूर्वी आम्ही प्रत्येक सीटमागे १५ रुपये घेत होतो. चार प्रवासी घेतल्याने आम्हाला प्रत्येक फेरीमागे ६० रुपये मिळत होते. आता प्रत्येक फेरीमागे ४८ रुपये मिळतात. मीटरने ५२ ते ५६ रुपये भाडे होते, असे त्याने सांगितले.

भूमी पार्क ते मालाड रेल्वे स्थानक प्रत्येक सीटमागे २० रुपये भाडे होते. आता रिक्षा चालकांनी आपले भाडे प्रति सीट १८ रुपये केले आहे, असे रिक्षा चालक सुनील साठे यांनी सांगितले. दादर स्टेशन आणि केईएम दरम्यान शेअर टॅक्सीचे दर ५ रुपयांनी कमी केले आहेत. आम्ही आमच्या नफ्याला कात्री लावली आहे, असे टॅक्सी चालकांनी सांगितले.

बसचे दर कमी केल्याने पहिल्या आठवड्यात बसच्या प्रवासी संख्येत २८ टक्क्यांनी वाढ झाली. तर महसूल ३० टक्क्याने कमी झाला. यापूर्वी प्रत्येक बस डेपोत रोजचा महसूल १२ लाख रुपये होता. तो ४ लाखांपर्यंत घसरला आहे.

बस आता गर्दीने ओसांडून वाहत आहेत. त्यामुळे अधिक बसची आवश्यकता आहे, असे वाहन सुनील कामत यांनी सांगितले. आम्ही पूर्वी प्रत्येक फेरीमागे ३५०० रुपये महसूल कमवत होतो. तो आता १९५० रुपयांपर्यंत घसरला आहे. नवीन रचनेत किमान अंतर ५ किमीचे आहे. ते ३ किमी करायला हवे, असेही त्यांनी सूचवले.

कोकेन तस्करीच्या गुन्ह्यांतील आरोपीस अटक

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - कोकेन तस्करीच्या गुन्ह्यांतील एका विदेशी नागरिकाला काल अमली पदार्थ विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. बोनाव्हेचूर एनझुवेचुक्कू एनवुडे असे या आरोपीचे नाव असून तो मूळचा दक्षिण आफ्रिकेचा नागरिक आहे. त्याच्याकडून पोलिसांनी एक किलो कोकेन जप्त केले असून त्याची किंमत सुमारे सहा कोटी रुपये आहे. अटकेनंतर त्याला येथील स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. खार परिसरात काही विदेशी नागरिक कोकेनची डिलीव्हरीसाठी येणार असल्याची माहिती वांद्रे युनिटच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. यानंतर पोलीस उपायुक्त शिवदीप लांडे यांच्या पथकातील अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांनी खार येथील न्यू लिंक रोडवरील सरदार राजेंद्रसिंग आनंद चौक परिसरात पाळत ठेवली होती. सोमवारी सायंकाळी तिथे बोनाव्हेचूर एनवुडे हा आला होता. त्याच्या हालचाल संशयास्पद वाटताच त्याला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले.

चैतन्य साधना

डॉ. मनीषा शेटे

नमस्कार माझा ...

भल्या पहाटे उठल्यावर जमिनीवर पाऊल ठेवायच्या आधी म्हणायचे कराग्रे वसते लक्ष्मी,करमध्ये सरस्वती करमूले तू गोविन्दम प्रभाते करदर्शनम' स्वतःच्या हातांकडे पाहून ही प्रार्थना म्हणायची आणि प्रसन्न मनाने नित्यकर्माला सुरुवात करायची.पण त्या आधी पुनश्चः जमिनीला दोन्ही हातांनी स्पर्श करून म्हणायचे, समुद्रवसने देवी पर्वतस्तनमंडले,विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शम क्षमस्वमे' दोन्ही श्लोकात किती सहज जीवनाकडे कसे पहा सांगितले आहे. पहिल्यामध्ये आधी स्वतःच्याच हाताला नमस्कार करायचा. धनलक्ष्मी, ज्ञानदायिनी सरस्वती आणि स्वनियंत्रित असा गोविंद ! गो म्हणजे इंद्रिय आणि विन्द म्हणजे जिंकणारा. स्वतःच्या इन्द्रियांवर विजय मिळवणाऱ्या गोविन्दाचेही स्मरण करायचे. म्हणजे धन,ज्ञान आपण कष्ट करून मिळवायचे हे खरे पण ते कोणाला मिळते तर ज्याचे स्वतःच्या इंद्रियांवर नियंत्रण आहे त्यालाच.. आणि मग नमस्कार करायचा तो पृथ्वीला. धनाची ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर उन्मत्त व्हायचे नाही तर अधिक नम्र व्हायचे. पाय नेहमी जमिनीवरच असायला हवेत हे तर खरेच !



स्नानाला सुरुवात केली की म्हणायचे 'हर हर गंगे' पाण्याच्या सान्निध्यात शांत तृप्त व्हायचे.

जेवताना भोजन मंत्र म्हणायचा, मग नमस्कार करून सुरुवात करायची. अन्नाला नावे ठेऊ नका अशा अर्थाचा मंत्र उपनिषदात आहे.कारण तो प्रत्येक कण शेतकऱ्यांच्या कष्टातून निर्माण होतो आणि गृहिणीच्या हाताने तुमच्या पानात येतो. तिचे मन आणि कष्ट त्यात असतात म्हणून ते सुखाने व आनंदाने ग्रहण करा.

संध्याकाळच्या शांत समयी देवासमोर सांजवात करायची आणि नतमस्तक व्हायचे. शुभंकरोती म्हणताना सांगायचे की 'शत्रूबुद्धी विनाशाय' घरात आणि घराबाहेर काम करताना वाद मतभेद होणारच करण व्यक्ती तितक्या प्रकृती !मग काय सगळ्यांशी भांडत बसायचे का? विषय संपला की वाद संपवता आला पाहिजे.म्हणजे रात्री झोपताना निद्रादेवी सहजच प्रसन्न होईल. जुनी लोक अगदी सहज म्हणायची ' पड पड कुडी गंगा भागिरथीच्या तीरी ,प्रयागी मरण ,काशीविश्वनाथा तुझे स्मरण.'

जीवनचक्राची अविरत लय जणू.आज रात्री झोपताना उद्याचा सूर्य दिसणार आहे की नाही कोणास ठावूक म्हणून झोपताना त्या शिवशंभोचे स्मरण करायचे.उद्याची सकाळ दिसली तर तो सूर्यनारायण आहेच स्वागताला उभा! सगळे जगणे निसर्गाशी बांधलेले आणि म्हणूनच त्यात एक प्रकारची सहजता आहे. त्या चक्रातून स्वतःला बाजूला फेकणे म्हणजे विनाशाची वाटचाल. म्हणूनच की काय निसर्गपूजेप्रमाणेच मानव्याचीही आपल्याकडे पूजा केली जाते.आई, वडील, गुरु, तपस्वी,योगी यांच्या रुपातील जीवनआदर्श समोर ठेवले जातात.गुरुंची पावले पकडायची आणि डूबणारी जीवननौका त्याच्या असीम कृपेच्या आधारे पार करायची.

जीवनाचा एक उदात्त विचार आपल्याकडे मांडला आहे तो कृतज्ञतेच्या भावनेतून. ही कृतज्ञता म्हंटले तर शब्दातून व्यक्त करता येते नाहीतर कृतितून. शब्दांपेक्षा कृती सहजपणे करता येते ती नमस्काराची! दोन्ही हात जुळवले व नतमस्तक झाले की मनातला सारा भाव सहज पोहोचतो.

क्रमशः

राज्यातील लोकसभेचे सर्व निकाल रद्द करा

प्रकाश आंबेडकर यांची मागणी ; वंचिततर्फे ३१ याचिका दाखल

एफपीजे राजकीय ब्युरो

मुंबई, मंगळवार-यंदाच्या लोकसभा निवडणुकीत इव्हीएम मशीनमध्ये नोंदवलेली मते आणि मतमोजणीनंतर मतांची आकडेवारीत तफावत आहे. त्यामुळे राज्यातील लोकसभेच्या ४८ जागांचे सर्व निकाल रद्द करा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली. वंचित बहुजन आघाडीने मुंबई उच्च न्यायालयात, नागपूर व औरंगाबाद खंडपीठाकडे ३१ याचिका दाखल केल्या आहेत.

राज्यातील सर्वच्या सर्व ४८ जागांवरील निकाल रद्द करावेत, अशी तक्रारही वंचित बहुजन आघाडीने निवडणूक आयोगाकडे केली आहे. मशीनमध्ये नोंदवलेली मते आणि मतमोजणीनंतर मतांच्या आकडेवारीत फरक असल्यास निवडणूक अधिकाऱ्यांना निकाल जाहीर करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

वर्धा लोकसभा मतदारसंघात १०,७१,१९० मतदान झाले. मतमोजणी १०,७२,५७० मतांची झाली. मतमोजणीत १३८० मते अधिक पडल्याचे आढळले. मुंबई उत्तर-पश्चिम मतदारसंघात ३०६, मुंबई दक्षिण-मध्य मतदारसंघात ७९ मते अधिक पडल्याचे आढळले. मुंबई उत्तर मध्य मतदारसंघात ९,०२,८१० मतदान झाले. मतमोजणी ९,०१,७८४ मतांची झाली. यात १३९८ मते कमी झाल्याचे दिसून आले. कल्याण लोकसभा मतदारसंघात मतमोजणीच्यावेळी १८५४ मते कमी आढळली. मतदानाच्यावेळी पडलेली मते आणि मतमोजणीनंतर मतांमध्ये असलेल्या फरकांबाबत न्यायालयाने स्पष्टीकरण मागवावे. याबाबत स्पष्टीकरण न झाल्यास न्यायालयाने २०१९ चे मतदान रद्द करून नवीन निवडणूक घेण्याचे आदेश द्यावेत, असे आंबेडकर यांनी सांगितले.

केवळ व्हीव्हीपॅट मशीनने मतमोजणी करून भागत नाही. उमेदवाराला पडलेली मते आणि मतमोजणीत तफावत असल्यास निवडणूक आयुक्तांना निकाल जाहीर करण्याचा कोणताही अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, निवडणूक आयोगाचे नियम निवडणूक अधिकाऱ्याला सक्तीचे आहेत. मतदान आणि मतमोजणीत तफावत आढळल्यास निवडणूक अधिकाऱ्याने निवडणूक आयोगाला कळवणे आवश्यक आहे, असे आंबेडकर यांनी सांगितले.निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांनी मार्गदर्शक तत्वांचे पालन केले नाही. कायद्याचे उल्लंघन करून निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांनी निकाल जाहीर केले. ४८ मतदारसंघातील निकाल अवैध आहेत. त्यामुळे निवडून आलेले उमेदवार हे प्रत्यक्षात निवडून आलेले नाहीत. त्यामुळे या सर्व विजयी उमेदवारांना दिलेली प्रमाणपत्रे परत घ्यावीत. याबाबत उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

विदर्भ, मराठवाड्यात २३ जुलैला कृत्रिम पाऊस पाडणार

विशेष प्रतिनिधी

मुंबई, मंगळवार - मुंबई, कोकण, पश्चिम, उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडत असला तरी, विदर्भातील अमरावती व मराठवाड्यातील औरंगाबाद आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागात पाऊस नसल्याने शेतकऱ्यांचे खरीपाच्या पेरण्या रखडल्या आहेत. तर पेरण्या होवूनही पाऊस न झाल्याने रोप जळून गेली आहेत. यापार्श्वभूमीवर वरील तीन जिल्ह्यात कृत्रिम पाऊस येत्या २३ जुलै, रोजी पाडण्यात येणार आहे.

विदर्भातील अमरावती विभागातील बुलढाण्याजवळील शेगाव व औरंगाबाद विभागातील बीड-लातूरच्या दरम्यान तर सोलापूर-सांगोला दरम्यान हा कृत्रिम पाऊस पाडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. एका बाजूला अर्ध्या महाराष्ट्रात पाऊसाने धुमाकूळ घातला असून. अर्ध्या भाग मात्र कोरडा राहिला आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी थोडा पाऊस झाला.

विमा कंपन्यांच्या कार्यालयावर आज शिवसेनेचा मोर्चा धडकणार

उद्धव ठाकरे मोर्चाचे नेतृत्व करणार

विशेष प्रतिनिधी

मुंबई, मंगळवार - पंतप्रधान पीक विम्याच्या संदर्भातील शेतकऱ्यांची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत, या मागणीसाठी शिवसेनेचा इशारा मोर्चा बुधवार वांद्रे-कुर्ला संकुलातील विमा कंपन्यांच्या कार्यालयावर धडकणार आहे. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत. पीक विमा कंपन्यांच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई वेळेवर मिळत नाही. विमा कंपन्यांच्या जाचक अटींमुळे शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित राहतात. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पीक विम्याचा प्रश्न गाजला होता. यापार्श्वभूमीवर उध्दव ठाकरे यांनी विमा कंपन्यांच्या कार्यालयावर इशारा मोर्चा काढण्याचे जाहीर केले. त्यानुसार उद्या सकाळी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मैदानावर शिवसेनेचा मोर्चा निघणार आहे.

सेक्स रॅकेट चालविणाऱ्या कॉल सेंटरच्या मालकाला अटक


मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - जाहिरातीच्या माध्यमातून सेक्स रॅकेट चालविणाऱ्या एका कॉल सेंटरच्या मालकाला काल वांद्रे येथील गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. रजनीशकुमार जितेंद्रप्रसाद सिंग असे या आरोपीचे नाव असून अटकेनंतर त्याला स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयाने शनिवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. वृत्तपत्र जाहिराती आणि कॉलसेंटरच्या माध्यमातून मुंबई शहरात सेक्स रॅकेट चालवित जात असल्याची माहिती मिळताच वांद्रे युनिटच्या अधिकाऱ्यांनी त्याची शहानिशा सुरु केली होती.

नवशक्ति 'ज्ञानशक्ति' दहावी मार्गदर्शन

MATHEMATICS (PART II)
Subhash Ramchandra Palav

1. SIMILARITY

2. In ΔABC, seg BD bisect ∠ABC, if AB = x, BC = x + 5, AD = x − 2, DC = x + 2. Then find the value of x. Also find perimeter of ΔABC.



Solution :

(i) In ΔABC, seg BD bisects ∠ABC,

$\therefore \frac{AB}{BC} = \frac{AD}{DC}$ ... angle bisector property of triangle

$\frac{x}{x+5} = \frac{x-2}{x+2}$ ... substitute the value

$x(x + 2) = (x - 2)(x + 5)$

$\therefore x^2 + 2x = x^2 + 3x - 10$

$\therefore -x = -10$

$\therefore x = 10$ ... multiple both the side by (−1)

$\therefore x = 10$ units

(ii) AB = x = 10, BC = x + 5 = 10 + 5 = 15


AC = AD + DC = x − 2 + x + 2 = 2x = 2 × 10 = 20

$\therefore$ Perimeter of ΔABC = AB + BC + AC

= 10 + 15 + 20 = 45

$\therefore$ Perimeter of ΔABC = 45 units

3. In trapezium PQRS, side PQ || side SR, AR = 5AP. Prove that SR = 5PQ.



Solution :

AR = 5AP ... given

$\therefore \frac{AP}{AR} = \frac{1}{5}$ ... equation (i)

In ΔAPQ and ΔARS,

∠PAQ ≅ ∠RAS ... vertically opposite angles

∠QPA ≅ ∠SRA ... alternate angles

$\therefore$ ΔAPQ ~ ΔARS ... similarity A.A. Test APQ ↔ ARS


$\therefore \frac{PA}{AR} = \frac{PQ}{SR}$ ... c.s.s.t

$\therefore \frac{1}{5} = \frac{PQ}{SR}$ ... from equation (i)

$\therefore$ SR = 5PQ

4 MARKS (HOT Questions)

1. In ΔABC, P and Q are points on the side AB and side AC respectively. Such that PQ is || to BC. Prove that median AD, drawn from A to side BC bisect PQ.



Solution :

Given : In ΔABC, seg PQ || side BC, seg AD is median to side BC.

To prove : PE = EQ.

Statement	Reason
In ΔAPE and ΔABD,	
∠PAE ≅ ∠BAD	... common angle
∠APE ≅ ∠ABD	... corresponding angle
$\therefore$ ΔAPE ~ ΔABD	... similarity A.A. Test APE ↔ ABD
$\therefore \frac{AE}{AD} = \frac{PE}{BD}$	... (i) c.s.s.t.
Similarly ΔAQE ~ ΔACD	... similarity A.A. Test AQE ↔ ACD
$\frac{AE}{AD} = \frac{EQ}{DC}$	... (ii) c.s.s.t.
$\frac{PE}{BD} = \frac{EQ}{DC}$	... (i) and (ii)
$\frac{PE}{EQ} = \frac{BD}{DC}$	... Alternendo
$\frac{PE}{EQ} = \frac{1}{1}$	... seg AD is median $\therefore$ BD = DC
$\therefore$ PE = EQ	

◆ **FOR PRACTICE :**

1. D, E and F are respective mid-points of sides AB, BC and CA of ΔABC. Find the ratio of the areas of ΔDEF and ΔABC.

Ans. : $\left(\frac{A(\Delta DEF)}{A(\Delta ABC)} = \frac{1}{4}\right)$

2. Prove that the ratio of the areas of two similar triangles is equal to the square of the ratio of their corresponding medians.

3. The ratio of the areas of two triangles with common bases is 3 : 2. Height of the larger triangle is 18 cm. Find the corresponding heights of smaller triangle. **Ans. : (12 cm)**

STD 8th - 9th - 10th ENGLISH & SEMI ENGLISH
11th - 12th SCIENCE ENGINEERING / MEDICAL / PHARMACY
11th - 12th COMMERCE CA FOUNDATION

studyplus EDUCATION INSTITUTE

LALBAUG BRANCH: +91 8655031231 / +91 7208010322
KALACHOWKI BRNACH: +91 8655031239

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
CIN: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: mcx.secretarial@gmail.com | वेबसाईट: https://www.mcxccl.com

३० जून २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० जून २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०१९ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०१८ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०१९ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	१,५००.८९	१,४६२.४३	-	३,३९३.५८
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	४८९.७८	४५८.६३	१६१.२९	१,३४०.६७
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	४८९.७८	४५८.६३	१६१.२९	१,३४०.६७
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	३४०.६४	२३८.३२	११६.५१	९४३.४४
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	३४०.१७	२७२.३०	११६.५१	९५९.६६
६. समभाग भांडवल (₹ १०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	१४,९९९.००	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	(२१,२२४.२५)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹ १०/- प्रत्येकी)*				
मूलभूत (₹)	०.१४	०.११	०.११	०.५८
सौमिकृत (₹)	०.१४	०.११	०.११	०.५८

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१) वरील तक्ता, त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप मूळ कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

२) कंपनीने क्लिअरिंग आणि सेटलमेंट ऑपरेशन्स सप्टेंबर १, २०१९ रोजी सुरू केल्या कारणाने, जून ३०, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरीता तुलनात्मक आकडेवारी उपलब्ध नाही.

३) दिनांक १६ जुलै २०१९ रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई | दिनांक: १६ जुलै २०१९